ई-साहित्य प्रतिष्ठान, वर्ष दुसरे, अंक - ३१, २५ ऑक्टोबर २०१०

# नवी काव्य भाकिते... नवी काव्यनक्षत्रे...



# Netअक्षरी


संपादिका

भारती सरमळकर (मुंबई)

सह संपादक

सोनाली घाटपांडे (पुणे)

स्वप्ना कोल्हे (नाशिक)

सचिन काकडे (मुंबई)


## 'मी कवी'

विशेषांक

LIGHT OF A NEW BEGINNING



# मी कवी

प्रतिभा ही सरस्वतीची देणगी आहे. ती कधी, कुणावर आणि कशी प्रसन्न होईल कसले महाकाव्य रचवील हे सांगता येत नाही. कोळ्यापैकी एखादा वाल्याही रामायण रचू लागतो. पण मराठीत कवींना हक्काचं असं व्यासपीठ आजवर नव्हतं. हक्काचं आणि मानाचं. दहा कोटी रसिक मराठी जनांपर्यंत त्यांच्या या कविता पोचणार तरी कशा ? एखादा काव्यसंग्रह छापला तर हजार प्रती छापताना दम निघतो. मराठीचा घोष करणारी दैनिकं हिंदी नट्यांच्या तसबिरी पानभर छापतील पण बोटभर जागेत मराठी कविता छापणार नाहीत. मराठी टिव्ही चॅनेल सासू सुनेच्या कथा चघळतील पण कविता, कथा किंवा दर्जेदार साहित्याचा प्रेक्षकांना वाराही लागू देत नाहीत.



# मी कवी

अशा वेळी ईंटरनेट, ई मेल्स अशा माध्यमांचा वापर करून नवीन उदयोन्मुख साहित्यिकांना एक व्यासपीठ उपलब्ध करून देण्याचं काम आम्ही गेली सहा वर्षं करीत आहोत. ऑर्कुटवर नोव्हेंबर २००४ साली ‘मराठी कविता’ नांवाची कम्म्युनिटी स्थापन करून या कार्याचा शुभारंभ झाला. आज या कम्म्युनिटीचे ४५००० लेखक कवी वाचक सभासद आहेत. पुढे त्याला अनेक शाखा फुटत गेल्या. त्यापैकीच एक नेटाक्षरी हे कवितांचं साप्ताहिक. ई मेल द्वारे सुमारे ६०००० मराठी वाचकांपर्यंत वितरीत होणाऱ्या या साप्ताहिकाचा हा ७९ वा अंक. हा एक खास अंक आहे. एक नवीन पाऊल आहे.



# मी कवी

पृथ्वी जशी स्वतःभोवती प्रदक्षिणा घालत असते तसे आम्ही आजवर आमचे सभासद असलेल्या ३४२ कवींमधूनच कविता निवडत होतो. हे सगळे ३४२ कवी म्हणजे ई साहित्य प्रतिष्ठानचे आधारस्तंभच. पण आमचे शक्तीदाते सूर्य म्हणजे आमचे ६०००० वाचक. म्हणून आम्ही या ६०००० वाचकांमधील कवींना आपल्या कविता पाठवण्याचे आवाहन केले.

**meekavee@gmail.com**

या id वर कविता पाठवण्याची विनंती केली. आणि प्रतिसाद पाहून आम्ही भारावून गेलो. इतक्या सुंदर आणि दर्जेदार कविता लिहीणारे कवी आमचे वाचक आहेत याचा आम्हाला प्रचंड अभिमान वाटतो. या पुढे दर महिन्याचा एक अंक आम्ही वाचक कवींसाठी राखून ठेवत आहोत.



# मी कवी

एकदा आमच्या व्यासपीठावर आलेले हे कवी आमचे कायम स्वरुपी कुटुंबीय होणार आहेत. एका नवीन महायज्ञाला सुरूवात होत आहे. पृथ्वीसारखं स्वतःभोवती गिरक्या घेत असतानाच आम्ही आता सुर्याला गंवसणी घालायला निघालो आहोत. आपली साथ असेल तर हे महान कार्य आपण पार पाडू आणि मराठी सारस्वतात एक नवीन अध्याय उघडू असा आम्हाला विश्वास आहे. आम्हाला आलेला प्रतिसाद इतका उदंड होता की एका अंकात तर सोडाच पण चार अंकही या कवींसाठी कमी पडणार आहेत. अमेरिकेपासून ते कर्नाटकापर्यंत जगभरातून आलेल्या नवकवींपैकी ११ कवी आज सादर करीत आहोत. इतर कवी पुढील महिन्यात आपल्या भेटीला येतीलच. आता येणार खरी मज्जा !

**टिम नेटाक्षरी**

ई-साहित्य प्रतिष्ठानच्या कुटुंबात आपले मनापासून स्वागत !!!

# शब्द सांज गारवा.....

शब्द बंध, शब्द गंध, शब्द सांज गारवा
शब्द गान, शब्द साज, शब्द सूर मारवा

शब्द स्वप्न, शब्द प्रेम, शब्द ध्येय लागले
शब्द मेघ, शब्द वीज, शब्द घुमू लागले

शब्द ओठी, शब्द पाठी, शब्द माळ गुंफली
शब्द भव्य, शब्द काव्य, शब्द ओढ लागली

शब्द रंग, अन तरंग, जळावरी पहुडले
शब्द मूक, शब्द रुप, आईन्यात पाहिले

शब्द श्वास आणि ध्यास, या मनास लागले
शब्द भास अन आभास, रात रात जागले

शब्द रात्र, धुंद गात्र, लाज लाज लाजले
शब्द अस्त्र, शब्द शस्त्र, घाव उरी लागले

शब्द एक क्षण उगाच, थांबला अधांतरी
शब्द हाक, शब्द साद, घालती हृदयांतरी

शब्द सय आणि भय, शब्द श्वास कोंडला
शब्द वेड, शब्द भान, शब्द ओठी थांबला

मी कवी
**प्राजक्ता पटवर्धन**
मॅंचेस्टर CT
prajakta.j.patwardhan@gmail.com

# भूल ही अशी घातली कुणी.....

एक एकटा चांद तो नभी
एक एकटी मी इथे उभी
तू ना जवळी आज या क्षणी
भूल ही अशी घातली कुणी

दूर दूर कोण खुणावतो मला
वेडावुनी कसे सोडितो मला
मी खुळी अशी विसरते भान
कोण पिसे तो लावितो मला

भास वाटतो मज तुझाच जरी
रुप तुझे असे ल्यायले कुणी
तू ना जवळी आज या क्षणी
भूल ही अशी घातली कुणी

पिठूर पिठूर हे नभी चांदणे
रात्रीचेही असे मंद चालणे
तो खेळतो खेळ तुझे पुराणे
आठवती मला सर्व तुझे बहाणे

तूच भोवती एक तूच जरी
गंध हा नवा आणला कुणी
तू ना जवळी आज या क्षणी
भूल ही अशी घातली कुणी

धुंद धुंद ही नशा वाढली
गुंतता मन मी सहज गुंतली
मेघ सावळा नसे हा जरी
राधेपरी मी सहज भाळली

तूच तो कुणी, तूच इथे जरी
“शरद” नाव तुझे ठेविले कुणी
तू ना जवळी आज या क्षणी
भूल ही अशी घातली कुणी

मी कवी

रूपेश सावंत
ठाणे
rupesh_mech473@yahoo.co.in

# कोरडेपणा.....

भिजली माझीच पाने
तू होतास कोरडा तेव्हा
मी, पाना-पानांनी झडलो
तू होतास कोरडा तेव्हा

अडगळीत मनाच्या माझ्या
मी तुलाच रुजवत होतो
मी कणा कणानी जळलो
तू होतास कोरडा तेव्हा

तू जवळून माझ्या जाता
मोहरला सुगंध वेडा
मी गहिवरुन पाहिले तेव्हा
तू होतास कोरडा तेव्हा

मी होत्या मुक्या मुक्याशा
ठेवल्या अपेक्षा थोड्या
त्या सहज विसरल्या जेव्हा
तू होतास कोरडा तेव्हा

मी अश्रू ढाळत होतो
हुंदकेही आवरत होतो
जेव्हा मीच स्वतःला सावरले
तू होतास कोरडा तेव्हा

ते कधीच कळले नाही तुला
जे सांगायचे होते मला
मी कोमेजलो मनात माझ्या
तू होतास कोरडा तेव्हा

चूकून मी छेडले तुला
तू दिलास विखारी पलटा
मी काट्या-काट्यांनी शहारलो
तू होतास कोरडा तेव्हा

मी कवी

**लक्ष्मीकांत बोंगाळे**
बेळगांव (कर्नाटक)
laxmikant.net@gmail.com

# दूरस्थ बाळास.....

"कळा ज्या लागल्या जीवा
मला की ईश्वरा ठाव्या !
कुणाला काय हो त्याचे
कुणाला काय सांगाव्या? ....भा.रा.तांबे

नयनी कां लागल्या धारा?
कोंडला जीव का सारा
कुठे तू दूरदेशी त्या
तेथला येई ना वारा.....

मनाला खेचितो मागे
तुझा तो धिंगाणा प्यारा
कुठे गेल्या तुझ्या वस्तु?
पसारा संपला सारा.....

मारिते हाक मी सोन्या
सोडुनी हातिच्या कामा
कुठुनी तू येईसी पाठी
ओढीशी माझीया पदरा.....

घास हा अडतो कंठी
तुझी ही लाडकी भाजी
करु केव्हा मी तुजसाठी
जेवण्या मित्रपरिवारा.....

पांघरुनी घेशी कां रोज
दिलेली तुजसी मऊ साडी
हाती बनवून ती दुलई
घराचा देई ऊबारा.....

कशी मी समजवू मजला
वाहूनी कोरडे डोळे
कसा रमला तू त्या देशी
तुटें कधी आकाशी तारा.....

मी कवी


वंदना धर्माधिकारी
कोथरूड, पुणे
vandana10d@yahoo.co.in


शिर्ट अक्षरी

# मन माझे.....

मन माझे, तुझ्यात कसे?
अन, तुझे मलाच शोधतसे?

सांग भाव लपलेले
तुझे तूच जपलेले
तू अबोल सर्वदा तर भाव हे येती कसे?

मी असाच शब्दवेडा,
शब्द शब्द, अर्थ जोडा
शब्द शब्द जोडताना नाव ते येते कसे?

एक एक श्वास तुझा
मन माझे का ध्यास तुझा
हे क्षणात लाजणे तुज गालावर आले कसे?

प्रेमवेडे गात्र गात्र
माझेच निमिष मात्र
काळीज एक जाहले तर स्पंदने गाती कसे?

माझीच तू सावली
का स्पर्शून थांबली
चिंबलेल्या काळजाला बांध मी घालू कसे?

भावनांच्या गूढ वाटा
चाललो सोडून ताठा
आत्र मात्र गुंतलेले सांग मी सोडू कसे?
मन माझे.....

मी कवी

संतोष थोरवतकर
मुंबई
cms.santosh.thorvatkar@citi.com

अक्षरी

# जीवन.....

देवा तुला सांगतो माणूस बनून बघ
माणसाच आयुष्य कधीतरी जग
माहीत आहेत मला तू अवतार होते घेतले
प्रत्येक अवतारात तुझ्या तू चमत्कार दावले
देवा तुझे चमत्कार आता चालणार नाय
पैशाशिवाय कलयुगात पान हलणार नाय
देवा तुला कळेल जेव्हा चक्र तुझ थांबेल
चक्रासाठी तुला बिल भराव लागेल
पोटासाठी तुला वणवण भटकाव लागेल
चपातीच्या तुकड्यासाठी झटाव लागेल
बायकापोर उपाशीपोटी झोपताना
वाहणारे अश्रु पुसून पडाव लागेल
जगण्यासाठी इथे तुला मराव लागेल
रोज मरुन सकाळी उठाव लागेल
म्हणून देवा तू माणूस बनून बघ
माणसाचं आयुष्य कधीतरी जग

मी कवी
**विघ्नेश जोशी**
मुंबई
joshi.vighnesh@yahoo.com

# आठवणींची वर्तुळे.....

मला वाटते यावे तुझ्या किना-यावर
पाहत रहावे एकटक त्या शांत पाण्याकडे
मधूनच उसळी मारणा-या त्या स्वच्छंदी माशाकडे
मधेच एखाद्या उमटणा-या वर्तुळाकडे

मनःपटल माझे तुझ्या पाण्यासारखे
आठवणींची वर्तुळे अजूनही जन्मतात इथे
आलो होतो तुजपाशी काही विसरायला
पण तुझी स्तब्धता मलाही खिन्न करते

मधेच उसळी मारुन वर येणा-या माशाप्रमाणे
आता मलाही बाहेर यावेसे वाटते
मग मी स्वतःशीच कुजबुजतो, “निघायला हवं आता”
पण तुझा किनारा मला सोडवत नाही

पुन्हा येईन मी तुझ्या किना-यावर असाच
पण एखाद्या वैशाखदिनी
कदाचित तेव्हा तू आटलेली असशील
नसेल ते शांत पाणी आणि नसेल ती स्तब्धता
आणि आपसूकच नसतील ती आठवणींची वर्तुळे

मी कवी


हर्षल घरत
harshallone@gmail.com


शिल्पअक्षरी

# खरचं मला एक करायच आहे.....

खरचं मला एक करायच आहे
एकदा हे जग जिंकायचं आहे
पण हे जग जिंकताना मला
एकदा तरी हरायचं आहे

खरचं मला एक करायच आहे
माझे लक्ष्य पार पाडायचे आहे
हे लक्ष्य पार पाडताना मला
शेवट पर्यंत लढत राहायचे आहे

खरचं मला एक करायच आहे
सर्वांना प्रकाश दयायचा आहे
पण प्रकाश देण्यापूर्वी मला
दिव्यासारखे जळत रहायचे आहे

खरचं मला एक करायच आहे
पतंगासारखे उंच उडायचे आहे
पतंगासारखे उंच उडताना दोरी बनून
जमिनीवर पण रहायचे आहे

खरचं मला एक करायच आहे
मला प्रेमात पडायचं आहे
पण खूप खोल जाण्यापूर्वी
परत काठावर परतायचे आहे

मी कवी
शिवदास अष्टेकर
पुणे
shivdas.ashtekar@gmail.com

अक्षरी

# कहाणी.....

वेदनेची माझी कहाणी
ऐक तू रे ध्यान देऊनी
चेतवू दे रे तुझी अस्मिता
सांगते मी सरणावरची समिधा

किती साहले किती भोगले
ना कधी ते हिशोब मांडले
ध्यास एक ती तोडू शृंखला
सांगते मी सरणावरची समिधा

मोहाचे क्षण आले हात जोडूनी
तरी ना पाहिले शिर झुकवूनी
घायाळ मी पाहूनी मायभू लुटता
सांगते मी सरणावरची समिधा

व्यर्थ अमुचे बलिदान झाले
लुटारु आज ते नेते जाहले
शल्य मनीं पुढे तुम्ही झुकता
सांगते मी सरणावरची समिधा

झुरतो नित्य आम्ही पंचमहाभूते
ना ध्यास ना आस कुणा मायभू ते
गिरीकंदरी हो रडे स्वातंत्रदेवता
सांगते मी सरणावरची समिधा

चला उठा सोडू आत्मकेंद्रिता
घरटी पक्षी एक स्वप्न पाहता
जातपात नको जोडू एकता
सांगते मी सरणावरची समिधा

स्वप्न उद्याचे तुम्ही आमचे
करा पूर्ण हो दया वचन ते
होऊ मुक्त तेव्हा तृप्त सर्वथा
सांगते मी सरणावरची समिधा

मी कवी
अरविंद बुधकर
कल्याण
arvind_budhkar@yahoo.co.in

शब्द अक्षरी

# पुरस्कार.....

नका देऊ हो मला पुरस्कार
कुठे ठेवू त्याला?
माझं घर खूप छोटं आहे

पुरस्कार देण्यासाठी माझी निवड करण्याऐवजी
माझ्या छोट्याशा घराच्या चार भिंतींच्या बाहेर असलेल्या
अफाट निसर्गाला का पुरस्कार देत नाही तुम्ही?

त्या निसर्गाने निर्माण केलेल्या जीवनदायी पाण्याची
अत्यंत निर्लज्जपणे नासाडी करणा-या
मनुष्यप्राण्याच्या माझ्यासारख्या एका प्रतिनिधीला पुरस्कार देण्याऐवजी
पाण्याची वाफ करणा-या उन्हाला, त्या वाफेचा पाऊस पाडणा-या ढगांना,
आणि त्या पावसाचं पाणी बर्फाच्या रुपात निसर्गाच्या लॉकरमध्ये
सुरक्षित ठेवणा-या थंडीला
का देत नाही तुम्ही पुरस्कार?

तुम्हाला वाईट वाटणार नसेल तर सांगू?
या पुरस्काराची घोषणा होताच मी प्रचंड शरमलो.
या वसुंधरेची अपरिमित हानी करणा-या एकाने दुस-याला पुरस्कार देऊन
एकमेकांवरुन कशासाठी आरत्या ओवाळून घ्यायच्या?
जिवंतपणी त्या पुरस्कारांच्या याद्या प्रसिद्ध करायला
की मरणोत्तर आणखी काही पुरस्कार मिळवायला?

खरचं, नका देऊ मला पुरस्कार,
अखेरच्या दिवशी माझी एक मिलीग्रॅम राखही स्वतःबरोबर नेण्याची व्यवस्था नसताना
या सर्व पुरस्कारांचं काय करु मी?

आणि तुम्हाला पुरस्कार द्यायचाच असेल तर त्या सर्वश्रेष्ठ निसर्गाला द्या
ज्याने अफाट वृक्षतोडीचा व प्रचंड प्रदूषणाचा अनन्वित अत्याचार सहन करुनही
आपल्या सर्वांना जिवंत राहू दिल आहे !


मी कवी
श्रीकांत पोहनकर
पुणे
shrikantpohankar@gmail.com

# बळ दे !

दोन हात जोडून माझं एकच मागणं देवा,
दुःख दूर करु नकोस, ते सोसायचं बळ दे !

कोण तसा जीवनात सुखासीन असतो?
स्व-दुःखात आणि पर-सुखात हसायचं बळ दे !

जीवनाच्या जुगारात हार-जीत असणारच,
एकदा तरी... 'सुंदर' शी खेळी फसायचं बळ दे !

दिवसाढवळ्या भले कितीही पापं लपून देत,
अंधारातही स्वतःच्या चुका दिसायचं बळ दे !

कुणीतरी जीव लावेलच ना या वेड्याला,
थकून कधी ते अश्रु ढाळील, तर पुसायचं बळ दे !

स्वप्न ऊरी कवटाळून रमी खेळत रहाणारा मी
सरते शेवटी प्लस व्हावं, इतकं पिसायच बळ दे !

स्वप्नपूर्तीनंतर फार जगावसं वाटत नाही, पण
राहिलोच तसा, तर सर्वांत असूनही नसायचं बळ दे !

मी कवी
उदय सप्रे
ठाणे
usapre@essar.com

अक्षरी

www.esahity.com

रसिकांना नेहमी उत्तमोत्तम आणि नवनवीन काव्य पुरविण्याचा ई-साहित्य प्रकाशनाचा ध्यास ‘नेटाक्षरी’ जोमाने पार पाडत आहे. दर आठवड्यात मिळणा-या तुमच्या प्रतिसादांनी आमचा उत्साह द्विगुणीत होतोय. आमच्या रसिक वाचकांच्या ह्याच उत्स्फुर्त प्रतिसादामुळे नेटाक्षरीने मागल्याच आठवड्यात नाबाद ७५चा पल्ला गाठला. नेटाक्षरी हा साप्ताहिक अंक सध्या सुमारे ६०००० हून अधिक मराठी रसिकांना विनामूल्य वितरीत केला जातो. त्या व्यतिरिक्त वेबसाईट्वर व्हिजिट करुन वाचणा-यांची संख्या लक्षणीय आहे. हा अंक आपण आपल्या ईष्टमित्रांना फॉरवर्ड करण्यास आमची काही हरकत नाही परंतु असे करताना आमच्या आयडीचा अंतर्भाव केल्यास आम्ही आभारी राहू. मराठी कवितेची लोकप्रियता वाढवण्यास आपला हातभार लागावा ही इच्छा. आपल्या सारख्या रसिकांच्या सहाय्याने हा अंक लवकरच एक लक्ष वाचकांपर्यंत नियमित पोहचवण्याचा आमचा संकल्प सिध्दीस जाईल असा आम्हाला विश्वास आहे.

---

**ई-साहित्य प्रतिष्ठानची इतर विनामूल्य ई-साप्ताहिके**

ई-स्टाप, स्वरनेटाक्षरी ऑडियो अल्बम, बालनेटाक्षरी

**प्रसिद्ध झालेली ई-बुक्स**

टल्लीची शाळा
मकरंदच्या त्रिवेण्या
ग्रेव्हयार्ड लिटरेचर
चार क्षण
तो आणि ती
प्रियेचे अभंग
देशी दारुचे दुकान-3D
ई-शाळा
तो, मी आणि सिगरेट
मोरया
लोकल गोष्टी
मीरा (अनुवाद)
ऑथंब
सावळ्या मुलीची गाणी

---

वरील ई-बुक्स विनामूल्य मिळण्यासाठी तसेच सूचना,अभिप्राय,प्रतिक्रियांसाठी संपर्क करा

**esahity@gmail.com**

नेटाक्षरीचा हा विनामूल्य अंक नियमित मिळण्यासाठी व सूचना,अभिप्राय,प्रतिक्रियांसाठी संपर्क करा

**netaksharee@gmail.com**